अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -७० | बुधवार दि.२९ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -70 | WEDNESDAY DT.29 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



भेंडटाकळी ता.गेवराई जि. बीड. आज गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवानेते माननीय शिवराजदादा पवार यांनी भेंडटाकळी चे मा.सरपंच कै.सर्जेराव भगवानराव जाधव यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले होते आज दादांनी जाधव कुटुंबियाची सांत्वनपर भेट घेऊन त्यांच्या कुटुंबियांना धीर दिला,त्यावेळी त्यांचा मुलगा मनोज सर्जेराव जाधव,त्यांचे बंधू भीमराव भगवानराव जाधव,भेंड टाकळी ग्रामपंचायतचे सदस्य श्री.राधेश्याम ऊबाळे,दत्ता ऊबाळे,विठ्ठल लांडे,ओमकार वाघमारे,जिवन जाधव,राहुल चव्हाण, येवले साहेब,कृष्णा (भैय्या) पाटोळे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## सासूच्या खूनप्रकरणी जावंइ, इंवईयाची निर्दोष मुक्तता -ॲड अविनाश गडले

बीड ।प्रतिनिधी

प्रकरणाची थोडक्यात हकिकत अशी की, सचिन तुकाराम कदम रा. मांडवखेल ता. जि. बीड याचे अलका हनुमान जोगदंड रा. वाणगाव ता. जि. बीड ह.मु. अंकुश नगर, बीड यांची मुलगी निकिता हिचे सचिन कदम याचे सोबत लग्न झाले होते. परंतु निकिता व सचिन कदम यांच्यामध्ये सतत भांडण करत होते ते भांडण मिटवण्यासाठी अलका जोगदंड या दिनांक. २३/०५/२०२० रोजी मांडवखेल येथे गेल्या होत्या व त्यांना आरोपी तुकाराम



रामभाऊ कदम हे मोटार सायकलवर घेवुन गेला होता. तेव्हा अलका हनुमान जोगदंड हिला सचिन तुकाराम कदम व त्याचे वडिल तुकाराम रामभाऊ कदम यांनी शेतात घेवुन जावुन ट्रॅक्टरची धडक देवुन व पुन्हा डोक्यात दगड मारुण अलकाचे प्रेत शेतात पुरुन टाकले असा आरोप आरोपीवर केला होता. आरोपी विरोधात नेकनुर पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. १२२/२०२० कलम ३०२,१२० (ब), २०२ भा.द.वि नुसार गुन्हा नोंद झाला या प्रकरणात तपासी अधिकारी लक्ष्मण केंद्रे पोलिस निरिक्षक नेकनुर पोलिस स्टेशन, यांनी तपास करुन आरोपी विरोधात चार्जशिट दाखल केले होते. त्याचा सेशन केस क्र. १०२/२०२० असा होता. या प्रकरणातील आरोपी हे अंडरट्रायल होते. या प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने एकुण १३ साक्षीदार तपासण्यात आले परंतु साक्षीदाराकडुन आरोपी विरोधात कसल्याही प्रकारचा सबळ पुरावा सिध्द झाला नाही. व आरोपी यांनी अलका हनुमान जोगदंड हिचा खुन केला हे सरकार पक्ष सिध्द करु शकला नाही. या प्रकरणात आरोपीच्या वकीलांनी

अभ्यासपुर्ण युक्तीवाद करुन आरोपी सचिन तुकाराम कदम व तुकाराम रामभाऊ कदम यांना चौथे जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड यांनी निर्दोष मुक्त केले आरोपीतर्फे ॲड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले त्यांना या कामी ॲड. बप्पा माने, ॲड. इम्रान पटेल, ॲड, गोवर्धन पायाळ, ॲड. तेजेश नेहरकर, ॲड. किरण मस्के, ॲड. राजाभाऊ बनसोडे, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड, शुभम सरवदे, ॲड. सचिन गिरी, ॲड. राजेश शिंदे, ॲड. वैभव धन्वे यांनी सहकार्य केले.

# आमदार अपात्रता निकाल ३१ डिसेंबरपर्यंत अशक्य!

## विधानसभा अध्यक्ष मुदतवाढ मागणार? अधिवेशन काळातही सुनावणी घेणार

प्रतिनिधी । मुंबई

**गेल्या काही दिवसांपासून शिवसेनेच्या १६ आमदार अपात्रता प्रकरणाची नियमित सुनावणी विधिमंडळात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुरू आहे. या सुनावणीत अनेक दावे-प्रतिदावे, आरोप केले जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ३१ डिसेंबरपर्यंत आमदार अपात्रतेप्रकरणी निर्णय घेण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. मात्र, दिलेल्या मुदतीत निकाल देणे कठीण असून, यासाठी वेळ वाढवून द्यावा, अशी विनंती सर्वोच्च न्यायालयाकडे केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राहुल नार्वेकर यांनी दोन्ही गटाच्या वकीलांशी चर्चा केली असून अधिवेशन काळातही सुनावणी घेऊ तर वेळ पडल्यास २१ व २२ डिसेंबर रोजी नागपूरातही सुनावणी घेण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.**

### ७ ते २० डिसेंबर या काळात हिवाळी अधिवेशन

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत होणार आहे. एकीकडे आमदार अपात्रता प्रकरणाची नियमित सुनावणी होत असताना दुसरीकडे विधिमंडळाचे कामकाज असणार आहे. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासाठी मुदतीत सुनावणी घेऊन निर्णय घेणे कठीण



असल्याचे बोलले जात आहे. हे सर्व करताना राहुल नार्वेकर यांची तारेवरची कसरत होणार आहे. ओव्हरटाइम करावा लागेल, असे म्हटले जात आहे. विधिमंडळाचे दैनंदिन कामकाज आटोपल्यानंतर सायंकाळी आमदार अपात्रतेप्रकरणी सुनावणी घेतली जाऊ शकते, असा देखील अंदाज व्यक्त केला जात आहे.

### निकालासाठी २० दिवसांचा कालावधी लागेल

आताच्या घडीला सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवली जात आहे. यानंतर सचिव विजय जोशी यांची साक्ष नोंदवली जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. डिसेंबर महिन्यापासून शिंदे गटाच्या नेत्यांची उलट साक्ष घेतली जाणार आहे. यामध्ये भरत गोगावले, दीपक केसरकर, उदय सामंत, योगेश कदम, दिलीप लांडे आणि राहुल शेवाळे यांचा समावेश असल्याचे समजते. सध्या शिंदे गटाच्या वकिलांना उलट साक्ष घेण्यास मुदत आहे.

### ..म्हणून मुदतवाढीची होऊ शकते मागणी

१ ते ११ डिसेंबरपर्यंत ठाकरे गटाचे वकील उलट साक्ष घेणार आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना या प्रकरणात सुनावणी आटोपताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. साक्ष संपल्यावर निकाल देण्यास २० ते २५ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. एकंदर परिस्थिती पाहता विधानसभा अध्यक्षांकडून सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ वाढवून मागण्याची विनंती केली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे.

### २१ जून २०२२ च्या ठराव प्रभूंनी नाकारला

दरम्यान, आमदार अपात्रता प्रकरणात दिरंगाई होत असल्याचा आरोप ठाकरे गटाचा आहे. ठाकरे गटाचे आमदार आणि प्रतोद सुनील प्रभू यांची साक्ष नोंदवली जात आहे. यामध्ये शिंदे गटाच्या वकिलांकडून अनेक प्रकारचे प्रश्न प्रभू यांना विचारले जात आहे. तर २१ जून २०२२ च्या ठरावाबाबत केलेला दावा सुनील प्रभू यांनी फेटाळला आहे.

### गरज भासल्यास २१, २२ ला नागपूरात सुनावणी

या संदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दोन्ही गटाच्या वकीलांशी चर्चा केली. ११ ते २० डिसेंबर या कालावधीत अंतिम सुनावणी होणार आहे. त्यानंतर गरज भासल्यास २१ व २२ डिसेंबर अशी दोन दिवस नागपूर येथेच सुनावणी घेतली जाईल, असेही राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

## अरे चोरा एखाद्या शेतकऱ्यांच्या कडबा पेंढ्या जळून काय भेटणार



जातेगाव परिसरात शेतकऱ्याचा उस जाळणे जनावरांचा गोठा जाळणे हा प्रकार वाढला

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई तालुक्यातील जातेगाव परिसरातील श्रीरामनगर वस्ती कॅनल रोड काळे वस्ती या परिसरात गेल्या दोन वर्षापासून जाणीवपूर्वक खोडसळपणा करत तब्बल दहा ते वीस शेतकऱ्याचे उभा ऊस जाळण्याचा प्रकार घडला असून, विहिरीवरील मोटर पाईपलाईन तोडणे, स्टार्टर तोडणे, मोटर चोरून देणे, जनावराचा गाय गोठा जाळून टाकणे, ठिबक सिंचन चे पाईप तोडणे , उभ्या पिकाचे नुकसान करणे जनावर ढोर सोडून देणे कापूस चोरणे,असा प्रकार सध्या घटना घडत असून जाणीवपूर्वक खोडसरपणा हा नालायक व्यक्ती करत आहे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान करत असुन बेशरम पनाची हद्द सोडली आहे शेतकऱ्याला जाणीवपूर्वक त्रास देण्याचे काम अज्ञात व्यक्तीकडून जाणीवपूर्वक होत आहे विशेष म्हणजे एक शेतकरी नाही तब्बल वीस ते पंचवीस शेतकऱ्यांचे नुकसान या परिसरातील शेतकऱ्यांचे नूकसान केले असून शेतकऱ्यांना नाहक त्रास अज्ञात व्यक्ती जाणीवपूर्वक वेडेपणा दाखवत करत आहे याचा ताबडतोब तलवाडा पोलीस स्टेशन यांनी तपास लावून बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# आगामी तीन दिवस अवकाळीचा कहर

## मराठवाड्यात येलो अलर्ट; पिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । बीड

बीड शहरात सोमवारी पहाटेच्या सुमारास दीड तासांहन अधिकवेळ जोरदार पाऊस झाला. या अवकाळी पावसाचा जोर जिल्हाभरात कमी-अधिक प्रमाणात दिसून आला. यामुळे रब्बी पिकांना जीवदान मिळाले असले तरी अनेकठिकाणी मोठे पीक नुकसान झाले आहे. मंगळवारी (दि.२८) सायंकाळीही बीड तालुक्यात काहीवेळ पावसाला सुरुवात झाली होती,

दरम्यान बीडसह मराठवाडा आणि राज्याच्या काही भागात गारपीट झाली. आता आणखी काही दिवस अवकाळी पावसाचे थैमान सुरूच राहण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने पुढील २४ तासांसाठी मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भासह कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे नागरिकांचं मोठं नुकसान झालं होतं. राज्यात पुढील दोन दिवस

हलका ते मध्यम स्वस्याच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. विदर्भात विजांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

अवकाळीने जोर चरल्यामुळे आता शेतकरी हवालदिल झाला आहे. पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यातच शेतकऱ्यांची चिंता बाढवणारा इशारा हवामान खात्याने दिला आहे. बीड जिल्ह्यात सोमवारी जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यानंतर काल मंगळवारी सायंकाळी बीड शहर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### उध्दव ठाकरेंची धनंजय मुंडेंवर टिका



शेतक-यांवर अकाली संकट ओढवले असून खात्यावर जमा झाली नाही. तर, काही शेतकयांना केवळ २० रुपयांचा चेक मिळाल्याचं सांगत उद्धव तन्यांच्या खात्यात पीक विम्याचे पैसे जान झाल्यास मी दिवाळी साजरी करणार नाही, असे धनंजय मुंडेनी म्हटले होते. उरेनी धनंजय मुच्या विधानाची आठवण करुन देत, शेतकयांना अद्यापही पौक निम्याचे पैसे का मिळाले नाहीत, असा सवाल केला, तसेच दिवाळीत टाक्यांचे आवाज़ ऐकू आले, पम कृषीमंत्र्यांचा आवाज ऐकू आला नाही, अशी टीकाही त्यांनी केली. राज्यातील शेतकरी संकटात असतानातील पंचनामे झाले आहेत की नाही, पीक विम्याचे पैसे किती शेतकयांना दिले गेले, नुकसानीचे पैसे तुम्ही कधी देणार, असा सवालही यांनी विचारता आहे तसेच, कृषीमंत्री म्हटले की, मी बस्तुनि माहिती घेऊन पंचनामे ज्यांची कोदर नाही, ते वस्तुनिष्ठ माहिती घेऊन काय करणार, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.राज्यातील सुमारे १६ ते १७ जिल्लामध्ये मागील दोन दिवस जरी पाऊस व बारपीट झाल्याने हज़ारो हेक्टर खेती बाधित झाली असल्याचे दूतआहे. तव आणखी पुढचे काही दिवसासाचा अंदाज आहेया अकी मारीटीने बतीत कापूस कांदा, केळी, मोसंबी,डाक्रिय, काढणीस आलेला भात,

हयांसह भाजीपालाआदी पिकांचे नुकसान झाल्याचेही निदर्शनास आले आहे कृषी, गपुनर्वसन यदि महसुल विभलाच्यातीने झालेला नात्यामुळे आलेले नुकसान यादी वस्तुनिष्ठ माहिती संस आहे. जिथे शेतकयांचे नुकसान झालेतदत करण्यासाठी शेतकयांच्या खंबीरपणे पाठीही उमेरप्याची शासनाची भूमिका आहे जगी माहिती 'एकना'वर कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

# प्रधानमंत्री ग्रामसड़क योजने अंतर्गत आणलेल्या रस्त्यांचे खा. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण संपन्न

## नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता : खा. प्रितमताई मुंडे

प्रतिनिधी । बीड

जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांना राष्ट्रीय मार्गांशी जोडल्यानंतर खा. प्रितमताई मुंडे यांनी ग्रामीण भागातील रस्त्यांना केंद्रस्थानी ठेवून जिल्ह्यात रस्त्यांचे जाळे उभारण्याच्या कामात आपले सातत्य असल्याची प्रचिती काल पुन्हा एकदा जिल्ह्याला दिली. ग्रामीण भागात दर्जेदार रस्ते आणि दळणवळण व्यवस्था उभारण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून मंजुरी आणलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गतच्या रस्त्यांचे भूमिपूजन आणि लोकार्पण त्यांनी काल केले. बीड जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार रस्ते आणि आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हीच आमची प्राथमिकता असल्याचे यावेळी त्या म्हणाल्या.

वडवणी तालुक्यातील तिगाव तांडा येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत एकूण सात कोटी अठ्ठाविस लक्ष रुपयांच्या तेरा किलोमीटरच्या रस्त्यांचे खा. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाले. तसेच केज तालुक्यातील सांगवी सारणी येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण झालेल्या रस्त्याचे व केंद्रीय रस्ते निधीतून मंजूर रस्त्याचे ही त्यांनी लोकार्पण केले. सारणी सांगवी आणि तिगाव तांडा येथे उपस्थित ग्रामस्थांशी ही यावेळी खा. प्रितमताई मुंडे यांनी संवाद साधला.

यावेळी खा. मुंडे म्हणाल्या कि 'पंकजाताई मुंडे यांच्याकडे जिल्ह्याचे पालकत्व असताना स्वप्नवत वाटावा असा अभूतपूर्व निधी जिल्ह्यातील विकास कामांसाठी मिळाला होता, या विकास निधीतून होणाऱ्या




कामांची आजही लोकार्पण केली जात आहेत. तेंव्हाच्या तुलनेत आता रस्त्यांसाठी कमी निधी आणला असला तरी या रस्त्यांचे आपल्या जीवनावर चांगले आणि दूरगामी परिणाम होणार आहेत. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण भागात होणाऱ्या रस्ते निर्मितीमुळे परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची प्रक्रिया सुलभ होणार आहे. सोबतच रुग्णांची हेळसांड देखील थांबणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आपण जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताला प्राधान्य देऊन कामे करत असून नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हीच आमची प्राथमिकता असल्याचे खा. प्रितमताई मुंडे यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी तिगाव तांडा इथे भाजपा नेते रमेशराव आडसकर, पोपटराव शेंडगे, मच्छिन्द्र झाटे, संजय आंधळे, धनराज मुंडे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. तर सांगवी सारणी इथे आ. नमिता मुंदडा, अक्षय मुंदडा, भगवान केदार, संतोष हांगे, डॉ. वासुदेव नेहरकर, विष्णू घुले, रमाकांत मुंडे, दत्ता धस, विजयकांत मुंडे, वसंत केदार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.समाज माध्यमांद्वारे सकारात्मकता पसरवा, तरुणांना खा. प्रितमताई मुंडे यांचे आवाहनसद्यस्थितीत समाज अत्यंत संवेदनशील प्रक्रियेतून जातो आहे. सोशल मीडियावर भावना व्यक्त करताना समाजात दुही निर्माण होणार नाही याची जवाबदारी आपली आहे. अशा वातावरणात आपण सकारात्मकता पसरवण्याचे काम करावे. सामाजिक एकोपा, सौख्य नांदावे याची काळजी घ्यावी. तरुणांनी संयम बाळगताना जेष्ठानी देखील त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. विकास निधी आणणे या जवाबदारीसह सामाजिक सलोखा, बंधुत्व अबाधित ठेवणे देखील आपली जवाबदारी असल्याने सर्वांनी संयम, आपुलकी, सदभावना ठेवावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# बहुजन अधिकार आंदोलन या संघटनेची संविधान दिनी स्थापना

प्रतिनिधी । धारूर




आज धारूर येथे पंचायत समिती सभागृहात अशोकराव सोनवणे ज्येष्ठ नेते यांचे अध्यक्षते खाली बैठक घेण्यात आली. सर्व प्रथम सर्व महापुरुष यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून बैठक सुरू करण्यात आली. या संघटनेचे अध्यक्ष राम शेंडगे तसेच धारूर येथील कार्यकर्ते यांनी सर्व सहभागी मान्यवर यांचे पुष्पुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. बैठकीचे प्रास्ताविक बाबुराव गालफाडे यांनी केले जिल्ह्यातील ऊस तोड कामगारांचे प्रश्न,गायरण जमिनीचे प्रश्न, अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जाती जमातीचे प्रश्न, महिला व अन्याय अत्याचारचे प्रश्न यावर सर्व सहभागी मान्यवर यांनी सखोल मार्गदर्शन केले. लवकरच जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालये यांचे समोर उपोषण, निदर्शने अशी तीव्र आंदोलन करण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकिस राम शेंडगे, अशोकराव सोनवणे, महादेव सातपुते, शेख बाबुभाई मिस्त्री, रामेश्वर सोनटक्के, बादलसिंग गोके, मारुती माने, अभिमान मस्के, संजय पवार, प्रकाश काळे, जेजेराव निरडे, दत्ता थोरात, राजेभाऊ हातागळे, रघुनाथ थोरात, दादाराव लोखंडे, विमलताई वैरागे, सटवाजी पाटोळे, असे अनेक मान्यवर या बैठकीस उपस्थित होते. शेवटी भारतीय संविधानाच्या प्रस्तविकेचे वाचन करण्यात आले. नवनिर्वाचित बीड जिल्हा आध्यक्ष तानाजी दूनघव यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या परळी तालुक्यातील तरुणाच्या कुटुंबीयास शासनाची दहा लाखांची मदत

## पालकमंत्री धनंजय मुंडेंच्या प्रयत्नातून तातडीने मदत कुटुंबियांना सुपूर्द

प्रतिनिधी । परळी

परळी - मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीतून आत्महत्या केलेल्या परळी वैद्यनाथ तालुक्यातील गोवर्धन (हि.) येथील तरुणाच्या कुटुंबाला राज्य शासनाच्या वतीने १० लाखांची मदत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून तातडीने मंजूर करण्यात आली असून, या रकमेचा धनादेश संबंधित कुटुंबास आज प्रशासनाच्या वतीने सुपूर्द करण्यात आला.परळी तालुक्यातील गोवर्धन गावच्या गंगाभीषण मोरे या तरुणाने काही दिवसांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीतून आत्महत्या केली होती. मोरे यांच्या कुटुंबियास मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी यशस्वी प्रयत्न केले. आज मोरे कुटुंबाला १० लाखांची मदत धनादेशाच्या स्वरूपात परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. यावेळी लक्ष्मण तात्या पौळ, राजाभाऊ चाचा पौळ, दत्ता मोरे, गणेश पौळ, भागावत




रासवे, बीबीशन जाधव, वैजनाथ जाधव, नायब तहसिलदार बाबुराव रुपनर, यांसह मयत मोरे यांच्या पत्नी श्रीमती कविता मोरे व कुटुंबातील अन्य सदस्य उपस्थित होते.

# नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावेत : रमेश आडसकर

प्रतिनिधी । बीड

माजलगाव । तालुक्यात दि. २६ रोजी वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात पाऊस झाला या पावसात रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून त्याचे तात्काळ पंचनामे करा अशी मागणी निवेदनाद्वारे भाजपा नेते रमेश आडसकर यांनी केली आहे. अवकाळी पावसामुळे हाता तोंडाशी आलेली पीक नष्ट होत आहे. अवकाळी पावसात फळबाग कापूस, ज्वारी, तूर या पिकांचे नुकसान झालेले आहे या नुकसानीची तात्काळ पंचनामे करून भरपाई द्वारे शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यात यावा अशी मागणी भाजप नेते रमेश आडसकर यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार वर्षा मनाळ यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अरुण

राऊत, बबनराव सोळंके, ईश्वर खुर्पे,



माणिक दळवे, लतीफ नाईक, माऊली सरवदे, विनायक रत्नपारखी, जयराम गायकवाड, अन्सर शेख, अनंत जगताप, बाळासाहेब क्षीरसागर, दत्ता महाजन, सतीश जोशी, अनंत यादव, अनंत शेंडगे आदींची उपस्थिती होती.

# शेतकरी मित्र बाबु कोकाट यांना राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । बीड

गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील शेतकरी मित्र बाबु (त्रिंबक) कोकाट यांना राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल पुरस्कार २०२३ जाहीर झाला आहे.नाशिक येथील प्रसिद्ध ग्रो केअर कृषिमंच या नावाजलेल्या संस्थेमार्फत या वर्षी चा राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल पुरस्कार २०२३ हा पुरस्कार महाराष्ट्रातील कृषीविस्तार क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल

पुरस्कार देण्यात येतो हा मानाचा कृषि पुरस्कार २०२३ या वर्षी गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव येथील संध्या मल्टी सर्व्हिसेस चे संचालक सी.एस.सी.चालक श्री.बाबु (त्रिंबक) कोकाट यांना जाहीर झाला असुन ६ डिसेंबर रोजी नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मध्ये या पुरस्कार सोहळ्याचे वितरण कृषी क्षेत्रातील उच्चपदस्थ मान्यवर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.नाशिक येथील प्रसिद्ध ग्रो केअर कृषिमंच या नावाजलेल्या संस्थेमार्फत दर वर्षी



महाराष्ट्रातील मान्यवरांना कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना हा मानाचा राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल पुरस्कार देण्यात येतो या वर्षी बाबु कोकाट यांना जाहीर करण्यात आला.सदरील पुरस्कार हा ६ डिसेंबर रोजी नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मध्ये राज्यातील कृषी क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकारी व राजकीय मान्यवर तसेच राज्यातील नामांकित मान्यवरांच्या प्रधान करण्यात येणार आहे.ग्रो केअर कृषीमंच संस्थात्मक अध्यक्ष भुषण निकम यांच्या सूचनेवरून व संयोजिका रोहिणी पाटिल यांच्या मार्गदर्शन खाली बाबु (त्रिंबक) कोकाट यांना जाहीर झाला.बाबु कोकाट यांनी संध्या मल्टी सर्व्हिसेस च्या माध्यमातून गेल्या चार ते पाच वर्षापासून या युवा शेतकऱ्याने शेतकरी मित्र संकल्पनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोठी कसरत घेतली आहे. सी.एस.सी केंद्रामार्फत परीसरातील शेतकऱ्यासाठी शेतकरी हिताचे मोठे काम त्यांनी केले आहे.परिसरातील शेतकऱ्यांना विविध योजनेची सर्व माहिती शेतकऱ्यांच्या बांधावर जावून सांगितली असल्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा फायदा झालेला आहे.त्या मुळे या नॅशनल लेवल (राष्ट्रीय ॲग्रो आयडॉल)पुरस्कार २०२३ बाबु (त्रिंबक) कोकाट यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



संविधान दिनानिमित्त ज्ञानसागर बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने

# पंचशील नगर येथे सामान्य ज्ञान स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी । बीड

ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने संविधान दिनाच्या औचित्य साधून सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत परिसरातील विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला स्पर्धेचे बक्षीस वितरण हे दिनांक ३ डिसेंबर २०२३ वार रविवार रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाचे रोख रक्कम ट्रॉफी प्रमाणपत्र व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र उत्तरेत करण्यात येणार आहेत या कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक गणेश वाघमारे माजी नगरसेवक विनोद मुळूक एडवोकेट बाप्पा ओटी हे उपस्थित राहणार असल्याचे यावेळी संयोजनांकडून सांगण्यात आले आहे. परीक्षक म्हणून प्राध्यापक शरद धनवे समता जोगदंड मिलिंद विद्याघर अजित वाघमारे रमेश दानवे यांनी काम पाहिले.हा कार्यक्रम यशस्विता पार पाडण्यासाठी अध्यक्ष विजय समीर शेख सहसचिव मोहन घोडके यांनी परिश्रम घेतले.

# भाजप सरकारच्या काळात दलितांवर अन्याय काँग्रेस प्रवक्ते राजहंस यांचा आरोप

प्रतिनिधी । घाटकोपर

भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यापासून दलित, मागास व अल्पसंख्याक समाजावरील अत्याचार वाढले आहेत, असा आरोप मातंग समाजाचे नेते व काँग्रेस प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी केला आहे.मागील दीड वर्षात अल्पसंख्याक व दलित समाजावरील हल्ले वाढले आहेत. नाशिकमध्ये मुंबईतील कुर्त्यातील मुस्लीम तरुणाचा झुंडशाहीने बळी घेतला, नांदेड जिल्ह्यात लग्नाच्या वरातीत आला म्हणून अक्षय भालेराव या दलित तरुणाची हत्या करण्यात आली. लातूरमध्ये किरकोळ

कारणावरुन दलित तरुणाची हत्या करण्यात आली. नाशिकमध्ये फटाके फोडण्याच्या वादातून हत्या करण्यात आली. नवी मुंबईत आंतरजातीय विवाहावरून दलित तरुणाची हत्या करण्यात आली. या घटना मनाला सुन्न करणाऱ्या आहेत. भाजप सरकारच्या काळातच या समाज घटकांवर हल्ले होत असताना सरकारकडून कठोर पावले उचलली जात नाहीत. मागासवर्गिय, दलित, अल्पसंख्याक समाज भीतीच्या सावटाखाली जगत आहे. सरकारने याकडे गांभियनि लक्ष देण्याची मागणी राजहंस यांनी केली आहे.

# गेवराई येथील बदर इंटरनॅशनल स्कूल मध्ये संविधान दिन साजरा




प्रतिनिधी । बीड

गेवराई येथील बदर इंटरनॅशनल स्कूल मध्ये संविधान दिनाचे औचित्य साधत विविध उपक्रम राबविले गेले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन वेगवेगळ्या प्रकारचे संविधान जागृती पोस्टर प्रदर्शन करत आपल्या भाषणातून संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे नियोजन, सुमैया मॅम, मिस अक्सा आणि मिस कुर्रत यांनी अगदी चोखपणे पार पाडले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री. पठाण सर यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक आदरणीय इजाज सर हे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात पठाण सर यांनी हृदयमानव अशोक सारख्या संविधानासाठी झटणाऱ्या लोकांची उदाहरणे देत ज्या नियम रुपी दोरीमध्ये आपला भारत देश बांधलेला आहे अशा कायदेरूपाचे अर्थात संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इम्रान शेख सर यांनी केले यावेळी त्यांनी संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी माहिती देत संविधानाचे महत्त्व स्पष्ट केले.



# राष्ट्रवादी पोलीस बॉईज व पटेल फाउंडेशनच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय येथे फळ वाटप

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई येथील उपजिल्हा रुग्णालय येथे २६/ ११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले सर्व शूर वीरांना राष्ट्रवादी पोलीस बॉईज असोसिएशन व पटेल फाउंडेशन बीड जिल्हा तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले यावेळी उपस्थित पोलीस बॉईज असोशियन चे जिल्हा अध्यक्ष व पटेल फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष मकसूद भैय्या पठाण पटेल फाउंडेशन चे शहराध्यक्ष मुशीर पटेल यांच्या वतीने हे कार्यक्रम राबविण्यात आले यावेळी उपस्थित जिल्हा रुग्णालयाचे सिस्टर स्वाती अहिरे मंजू स्वभावले सामाजिक कार्यकर्ते ,आजहर शेख शेख अबुजर , पटेल फाउंडेशन तालुका सचिव अनिल जवंजाळ यांची उपस्थिती होती

# मिल्लिया महाविद्यालयात व्याख्यानमाला

## शिक्षण हे सर्व जाती धर्मासाठी आवश्यक - डॉ.शामल जाधव

प्रतिनिधी । बीड

बीड: येथील मिल्लिया कला विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या सामाजिकशास्त्र विभाग व विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २८ नोव्हेंबर २०२३ मंगळवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान या व्याख्यानमालेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ, उपप्राचार्य डॉ. हुसैनी एस.एस. डॉ.शामल जाधव, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. खय्युम फारुखी, डॉ .शेख गफुर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सय्यदा तनवीर यांची उपस्थिती होती. प्रमुख वक्त्या डॉ.शामल जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व




त्यांचे भारतीय संविधान निर्मितीत असणारे योगदान याबद्दल माहिती दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण जीवन हे भारतीय समाजाच्या कल्याणासाठी व्यतित केले. घरात समान वागणुकीचा अधिकार, देशातील सत्ता संभाळण्याचा अधिकार संविधानाने महिलांना दिला. त्यामुळेच आज आपण पाहतो की महिला या उच्च पदापर्यंत पोहोचलेल्या आहेत. संविधानाने सर्व जाती धर्मांच्या महिलांना नोकरी करण्याचा समान अधिकार दिला. शिक्षण हे सर्व जाती धर्मासाठी आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान स्पष्ट केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळेच आज आपण आपल्या अधिकाराबाबत जागरूक आहोत असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. सय्यदा तनवीर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापिका फर्रा फातेमा नेहरी यांनी केले. या व्याख्यानमालेत एकूण पाच व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत, असे व्याख्यानमालेच्या संयोजिका तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सय्यदा तनवीर यांनी सांगितले. कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती.



# संविधान दिनानिमित्त ज्ञानसागर बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने पंचशील नगर येथे सामान्य ज्ञान स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी । बीड

ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने संविधान दिनाच्या औचित्य साधून सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत परिसरातील विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला स्पर्धेचे बक्षीस वितरण हे दिनांक ३ डिसेंबर २०२३ वार रविवार रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांकाचे रोख रक्कम ट्रॉफी प्रमाणपत्र व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र उत्तरेत करण्यात येणार आहेत या कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक गणेश वाघमारे माजी नगरसेवक विनोद मुळूक एडवोकेट बाप्पा ओटी हे उपस्थित राहणार असल्याचे यावेळी संयोजनांकडून सांगण्यात आले आहे. परीक्षक म्हणून प्राध्यापक शरद धनवे समता जोगदंड मिलिंद विद्याघर अजित वाघमारे रमेश दानवे यांनी काम पाहिले.हा कार्यक्रम यशस्विता पार पाडण्यासाठी अध्यक्ष विजय समीर शेख सहसचिव मोहन घोडके यांनी परिश्रम घेतले.

# दिंद्रुडच्या सरपंच, ग्रामसेवक यांच्यावर संताप

## महिलेची सहकुंटुंबसह इच्छा मरणाची परवानगीचे जिल्हाधिकारींना निवेदन

**प्रतिनिधी । दिंद्रुड**

माजलगाव तालुक्यातील ग्रामपंचायत कायम सरपंच व ग्रामसेवक यांच्यामुळे वादात राहिलेले आहे. येथे गेल्या अनेक वरश्यापासून सरपंच व ग्रामसेवकांच्या विरोधात गावातील सर्वसामान्य नागरिक व ग्रामपंचायत सदस्य हे सुद्धा यांच्या मांमणीला कंटाळून विरोधात निवेदने देण्यात आलेले आहे आणि या वादग्रस्त ग्रामपंचायतच्या सारपंचवर अजून एका निवेदनाची भर पडली असून गावातील सीमा मनोहर देशमाने या महिलेला ग्रामसेवक व सरपंचाच्या जाचाला कंटाळून थेट जिल्हाधिकारी यांच्या कळे सह कुटुंब इच्छा मरणाची परवानगी मागितली आहे.गावातील सीमा मनोहर देशमाने ही ४० वर्ष्याची महिलेची परिस्थिती अत्यंत हलाकीची असून मजुरी करून आपले व आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करते. दिंद्रुडचे सरपंच अजय कोमटवार व ग्रामसेवक हे जाणीवपूर्वक या महिलेला त्रास देण्यासाठी ग्रामपंचायत तर्फे सदरील महिलेला तुझे घर अतिक्रमात आहे असे म्हणून नोटीस देतात परंतु आमचे घर हे अतिक्रमात नसून गेल्या साठ वर्षा पासून राहते सदरील प्रकरण असे आहे की या महिलेला शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळाला असून सदरील महिलेला ग्रामपंचायने परवानगी दिली आहे परंतु आत्ता आपले घर अतिक्रमणात आहे म्हणून नोटीस दिली आहे. माझे घर अतिक्रमात नसून जे लोक खरोखर अतिक्रमात राहत असून हे सरपंच व ग्रामसेवक अभय देतात आणि मला फक्त त्रास देण्याच्या हेतूने नोटिसा पाठवीत असून त्याव्यतिरिक्त ग्रामपंचायतीचे लोक रात्री बेरात्री घरी येतात, फोन लावून बोलायला सांगतात, ग्रामपंचायतीला हजर रहा अश्या प्रकारे ह्या महिलेला प्रताडीत करीत असून दलित कुटुंबातील गरीब महिलेच्या पतीला बीपी व शुगरचा त्रास असून यांच्या त्रासापासून पतिला तीन वेळा दवाखान्यात न्यावे लागले आहे. या ग्रामपंचायतचे सरपंच व ग्रामसेवक यांच्या जाचातून मुक्त करा किंव्हा इच्छा मरणाची परवानगी द्या अश्या आशेचे निवेदन देऊन महिलेने थेट जिल्हाधिकारी यांच्या कडे धाव आणि कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला काही झाले तर त्याची जवाबदारी सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर राहील असे निवेदनात म्हटले आहे.

# राहूल देशपांडे यांना पत्रकारितेतील अविरत योगदानाबद्दल पुरस्कार

**प्रतिनिधी । अंबाजोगाई**




अंबाजोगाई - योगेश्वरी वधु वर सूचक मंडळ अंबाजोगाईच्या वतीने जेष्ठ पत्रकार राहूल देशपांडे यांना पत्रकारितेतील अविरत योगदानाबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमासाठी आ. नमिता मुंदडा,अनिरुद्ध चौसाळकर,डॉ.एन.पी. देशपांडे,पत्रकार अविनाश मुडेगांवकर, प्रशांत बर्दापुरकर, प्रभाकर सेलमुकर आदी मान्यवर उपस्थित होते. पत्रकार राहूल देशपांडे यांच्या दोन तपापेक्षा अधिक वर्षाच्या सामाजिक, सांस्कृतिक,अध्यात्मिक क्षेत्रातील कार्याची नोंद घेऊन मान्यवरांच्या उपस्थितीत राहूल देशपांडे यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी राहूल देशपांडे म्हणाले की,अंबाजोगाई शहरात विविध क्षेत्रात उस्फुर्तपणे कार्य केले तसेच ते आजही चालूच आहे या सर्व कार्याचा परिपाक हा गौरव असून यामुळे अधिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या कार्यक्रमास महिला, नागरीक उपस्थित होते. त्यांना प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# ढोरवाडीच्या सरपंचाचे पद धोक्यात जिल्हा जात पडताळणी समितीकडे तक्रार

## प्रस्तावा सोबत दाखल केलेले दस्तावेज खोटे असल्याची नवनाथ काळे यांची तक्रार

**प्रतिनिधी । वडवणी**

वडवणी :- वडवणी तालुक्यातील ढोरवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत अनुसूचित जाती प्रवर्गातून निवडून आलेले सरपंच आत्माराम सखाराम माने यांचे जात प्रमाणपत्र खोटे दस्तावेज काढून काढलेले आहे. यामुळे जात वैधता प्रमाणपत्राला जोडलेले दस्तावेज खोटे असून जोडलेली वंशावळ जुळत नसल्याची तक्रार समाजसेवक नवनाथ रोहिदास काळे यांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तक्रार केली आहे.



याबाबत आधिक माहिती अशी कि, वडवणी तालुक्यातील ढोरवाडी ग्रा.प.निवडणूक हि साधारण ११ महिन्या पुर्वी झाली आहे. सरपंच पद हे अनुसूचित जातीसाठी राखीव असल्याने याठिकाणी आत्माराम सखाराम माने हे निवडून आले आहेत. यांच्याकडे अनुसूचित जाती प्रवर्गातील 'होलार' जातीचे प्रमाणपत्र देखील आहे. याबाबत ढोरवाडी येथील रहिवाशी आणि समाजसेवक असणारे नवनाथ रोहिदास काळे यांनी या प्रश्नी जिल्हा जात पडताळी समितीकडे तक्रार केली आहे. यामध्ये असे म्हटले आहे कि, सरपंच आत्माराम सखाराम माने हे जातीने 'होलार' नसून हटकर 'धनगर' आहेत. जिल्हा जात पडताळणी समितीकडे दाखल केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रस्तावासोबत दिलेली वंशावळ पूर्ण खोटी व बनावट स्वरुपाची असून नातेसंबध स्पष्टपणे दिसून येत नसून ती बनावट बनवलेली आहे. तक्रार केलेल्या नंतर सरपंच यांच्याकडून कुठलेही म्हणणे मांडण्यात आले नाही, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून लिहून दिलेले आहे की, सरपंच हे अशिक्षित आहेत व माझ्याकडे कुठल्याही प्रकारचा शैक्षणिक पुरावा नाही. तसेच दुसरीकडे सरपंच हे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळी समितीकडे शाळेचा निर्गम उतारा व सुशिक्षित असल्याचे लिहून देतात व सोबत शाळेचा निर्गम जोडतात. यावरून सरपंच असणारे आत्माराम सखाराम माने यांचा खोटारडेपणा दिसून येतो. तसेच सरपंचांनी आपली खरी जात लपवत असल्याचे दिसून येत आहे. तर सरपंच माने यांनी सरपंच पदाचा लाभ घेण्यासाठी समितीकडे खोटी व बनावट स्वरुपाची माहिती सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठीचा प्रस्ताव दाखल केला असल्याने याविरोधित तक्रार दाखल केली असून सदरील प्रमाणपत्र रद्द करुन जात वैधता प्रमाणपत्राचा प्रस्ताव देखील रद्द करावा अशी तक्रार समाजसेवक नवनाथ रोहिदास काळे यांनी केली आहे.

# परळी शहरातील भीमनगर व साठे नगर येथील अवैध धंदे बंद करण्यासाठी १ डिसेंबर पासून सर्वपक्षीय कार्यकर्ते उपोषणास बसणार

**प्रतिनिधी । परळी**



परळी शहरातील भीमनगर व साठे नगर येथील अवैध धंदे बंद करण्यात यावेत या मागणीसाठी या भागातील सर्वपक्षीय कार्यकर्ते ०१ डिसेंबर २०२३ पासून परळी पोलीस स्टेशन व संभाजीनगर पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषण करणार असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर व साठे नगर येथील सर्व अवैध धंदे बंद करण्यात यावेत यासाठी लेखी निवेदन परळी पोलीस स्टेशन व संभाजीनगर पोलीस स्टेशन, दि. १४ / १०/ २०२३ रोजी दिले असता कुठल्याच प्रकारची कारवाई न झाल्याच्या कारणाने परत दिनांक २/ ११/ २०२३ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक बीड यांना प्रत्यक्ष भेटून व लेखी निवेदन देऊनही आत्तापर्यंत कुठल्याच प्रकारची कारवाई न झाल्यामुळे सदरील अवैद्य धंदे, हातभट्टी दारू विक्री सर्रास परे चालू असून या धंद्यामुळे गोरगरिबाचे संसार उध्वस्त होऊन वाटोळे होत आहे तर दारूच्या आहारी जाऊन युवकांचे जीवन बरबाद होत असल्याकारणाने सदरील अवैद्य धंदे करणारा वर एम.पी.डी.अंतर्गत गुन्हे दाखल करून सदरील विभागातील अवैध धंदे बंद करण्यात यावे अशी लेखी मागणी देऊनही कुठल्याच प्रकारची कारवाई न झाल्यामुळे आम्ही खालील सर्वजण वैजनाथ तात्या जगतकर माजी नगराध्यक्ष नगरपरिषद परळी वैजनाथ अनिल मस्के गुत्तेदार पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते सोपानराव ताटे, नगरसेवक नितीन रोडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालासाहेब जगतकर, राष्ट्रवादीचे भैय्यासाहेब आदोडे, धम्मा अवचारे, संतोष आदोडे,राघू ताटे, अंबादास रोडे शुद्धधन साळवे, जतीन जगतकर, सुनील हनवते,पी. पी.एरलीं, वसंत बनसोडे, अशोक जगतकर यांच्यासह महिला ही उपोषणास बसणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

# विहिरीच्या ब्लास्टिंगने श्री क्षेत्र जोतिबा उपळी देवस्थानातील घोड्याला गंभीर दुखापत

**प्रतिनिधी । वडवणी**

वडवणी ता.उपळी येथील कुंडलिका तलावावरून लोनवळ व बाबी तांड्या कडे जाणाऱ्या जल जीवन योजनेसाठी करण्यात आलेल्या विहिरीच्या ब्लास्टिंगने श्री क्षेत्र जोतिबा उपळी देवस्थानातील घोड्याला गंभीर दुखापत वडवणी तालुक्याती कुंडिलिका तलावाच्या बाजूलाच श्री क्षेत्र जोतीबा देवस्थान आहे तेथे मंदिर आवारात बाधलेल्या घोड्याला तलावाच्या व जोतीबा मंदिराच्या मधोमध खोदकाम करत असलेल्या विहीरीच्या ब्लॉस्टींगचे दगड उडून गंभीर दुखापत झाली आहे समन्धीत जलीजीवन योजना करणार्या गुत्तेदाराने पाठबंधारे विभागाची परवानगी न घेताच तलावाच्या साडव्याच्या दिशेने ब्लॉस्टीग उडवत असल्याचे ग्रामस्थातुन बोलले जाते



.ही योजना कुंडलिका तलावावरून लोनवळ व बाबी तांड्या कडे जल जीवन योजने अंतर्गत नेहली जात आहे या योजनेचे विहीर खोदकाम कुंडलिका तलाव परिसरात ब्लास्टिग घेऊन केले जात आहे .जोतिबा देवस्थानातील घोड्याला दुःखापत झाल्याने ग्रामस्थात संताप व्यक्त केला जात आहे या घोड्याची दुखापत दुरुस्तीसाठी कुठल्याही डॉक्टरला संपर्क करण्यात आलेला नाही .

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या पाटोदा ता.कार्याध्यक्ष पदी जावेद शेख यांची निवड

**प्रतिनिधी । गेवराई**

पाटोदा येथील रहिवासी पत्रकार जावेद शेख यांची माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या पाटोदा ता.कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.जावेद शेख हे गेल्या अनेक वर्षापासून पत्रकार क्षेत्रांमध्ये काम करीत आहेत पत्रकार क्षेत्रात काम करीत असताना गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या हिता बरोबरच सामाजिक कार्यातही डॉ. गणेश ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी बजावत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेत

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या आदेशाने व सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख डॉ गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनाखाली शेख जावेद रज्जाक यांची पाटोदा ता.कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली त्यांच्या निवडीबद्दल




सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे,किसान सभेचे राष्ट्रीय सदस्य कॉ.महादेव नागरगोजे, शेकापचे जिल्हा सरचिटणीस भाई विष्णूपंत घोलप, जेष्ठ पत्रकार अ.कादर मकराणी,विजय जाधव,हमीदखान पठाण, कॉ.गाडेकर मामा,महेमुद भाई नायगाववाले,चंक्रपाणी दादा,खालेद भाई,कॉ.अतुल देवडे,इलियास भाई,मोसिन भाऊ,वाजेद शेख, आदींनी सत्कार करत शुभेच्छा दिल्या तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध मान्यवरांनी अभिनंदन करत



# राष्ट्रवादीच्या विजाभज सेलच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश राठोड

**प्रतिनिधी । बीड**

बीड - मागील अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहून सक्षम पणे समाजसेवा करत असलेले आमदार संदीप क्षीरसागर यांचे खंदे समर्थक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार जनसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवत राष्ट्रवादीच्या विचारधारेवर चालणारे युवा नेतृत्व रमेश राठोड यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विमुक्त जाती भटक्या जमाती सेलच्या जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा खा.शरद पवार साहेब यांच्या विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी आणि युवकांचे प्रेरणास्थान रोहितदादा पवार यांच्या विराचातील सक्षम महाराष्ट्र तरूणांच्या हाती लाभावे या विचारधारेवर काम करणार्या युवा नेतृत्व पुढे नेण्यासाठी तसेच खा.सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, युवा प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष आमदार संदिपभैय्या क्षीरसागर यांच्या सोबत खंबीरपणे साथ देत काम करणारे युवा तरूण तडफदार नेतृत्व रमेशभाऊ राठोड यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विमुक्त जाती भटक्या जमाती सेलच्या बीड जिल्हाध्यक्षदी आ. संदिप क्षीरसागर, विमुक्त जाती भटक्या जमाती सेलचे प्रदेशाध्यक्ष हिरालाल राठोड यांच्या हस्ते निवडपत्र देवून निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे बीड मतदार संघासह जिल्ह्यामध्ये युवकांची नवी फळी तयार होणार असल्याचे दिसून येत आहे. रमेश राठोड यांचा असलेला दांडगा जनसंपर्क पक्ष बांधणीसाठी कामी येणार असल्याचे दिसून येत आहे.




# कृषीकन्यांकडून शेतकऱ्यांना बॉर्डेक्स पेस्टबद्दल मार्गदर्शन

**प्रतिनिधी । पांढरकवडा**

तालुक्यातील कोंधारा येथील कृषी महाविद्यालयातील सातव्या सत्रामध्ये शिकत असणाऱ्या कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना वॉर्डेक्स पेस्ट बद्दल मार्गदर्शन केले. दातपाडी या गावामध्ये असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना बॉर्डेक्स पेस्ट काय आहे याचा कायदा काय त्याचे महत्त्व ते कशाप्रकारे तयार करायचे त्यामध्ये लागणारे सर्व साहित्य या सर्व घटकांची माहिती व ते कोणत्या झाडांसाठी उपयुक्त असते, कोणत्या रोगासाठी उपयुक्त असते या सर्वांची माहिती कृषीकन्या शर्वरी दसोडे, वैष्णवी काळे, रासेश्वरी जुमडे सृष्टी गायमुखे, वैष्णवी कोटकर यांनी दिली. तसेच त्यांना प्रा. काजल माने यांचे मार्गदर्शन मिळाले. बोर्डेक्स पेस्ट हे मुख्यतः फळझाडांसाठी उपयुक्त आहे त्यावरील शेंगांसाठी बॉर्डेक्स पेस्टचा उपयोग केला जातो.

जसे की खोडसड, डिंक्या रोग, पावडर यासाठी बॉर्डेक्स पेस्टचा उपयोग केला जातो आणि पावडर बुरशी व खालची बुरशी यासारख्या रोगांसाठी बॉर्डेक्स मिश्रणाचा उपयोग केला जातो.

# शिवाजीनगर येथील बलभीम नगर बुद्ध विहार संघर्ष समिती कडून भारतीय संविधान दिन साजरा

## आपले संविधान आपला आत्मसन्मान भारतीय संविधान विषयक जनजागृती अभियान!

**प्रतिनिधी । बीड**

शिवाजीनगर येथील बलभीम नगर बीड येथे दिनांक २६/११/२३रोजी संविधान दीना निमित्त कार्यक्रमाचे आयोजक ऍड तेजस वडमारे यांनी आयोजित केला होता त्यावेळी संविधानाच्या प्रास्ताविका व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून ऍड तेजस वडमारे यांनी भारतातील मानवमुक्तीचा जाहीरनामा, म्हणजे भारतीय संविधान! त्याच भारतीय संविधानाचा गौरव दिन, २६ नोव्हेंबर.! या संविधान गौरव दिनानिमित्त संविधान विषयक जनजागृती अभियान राबवून

संविधानाची जनजागृती म्हणून संविधनातील न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता हे मूल्य आपल्या रोजच्या जगण्यात यावीत व या चार मूल्यांच्या आधारावर भारतीय समाज तयार व्हावा म्हणून आम्ही संविधानाची जनजागृती म्हणून संविधातील मूल्यांचा प्रचार करत आहोत जेणेकरून संविधान आणि त्याची मूल्य तळागाळतील माणसापर्यंत




पोहचवण्यासाठी प्रयत्न करत आहोत,हे संविधान शाळेतील अभ्यासक्रमात समाविष्ट करणे आवश्यक आहे, तशी मागणी आपण सर्वांनी शासनाकडे करणे गरजेचे आहे,असे संविधान जागृती करताना थोडक्यात विचार मांडले त्यानंतर सामूहिक संविधाची प्रास्ताविका वाचन करून संविधान दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमा साठी अंजली तेजस वडमारे यांनी सहकार्य केले, या कार्यक्रम मास सरिता खेमाडे, जयश्री गवळी जयश्री वडमारे, जाणकाबाई पोळास, स्वाती वडमारे,आम्रपाली गवळी,प्रिती राजेश शिंदे,गौतम खेमाडे, सिद्धार्थ विद्यागर,आरेफ मोमीन, बन्सी वाघमारे, ऍड उदय तुपारे ऍड राजेश शिंदे,मयूर कुदळे,पप्पू मांडवे व परिसरातील बौध्द उपासक, उपासिका व संविधान प्रेमी बुहुसंख्येने उपस्थित होते.

# ठाकरे गटाचे नेते दत्ता दळवींना अटक

**मुंबई @ प्रतिनिधी**

भरसभेत मुख्यमख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवीगाळ करणं दत्ता दळवी यांना भोवलं आहे. दत्ता दळवी यांना आज सकाळी अटक करण्यात आली आहे. भूषण पलांडे यांच्या तक्रारीनंतर भांडुप पोलिसांनी माजी महापौर दत्ता दळवी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. भा.द.वि कलम १५३(अ),१५३(ब),१५३(अ)(१)सी,२९४, ५०४,५०५(१)(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांवर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी आता दत्ता दळव यांना अटक करण्यात आली आहे. या संदर्भातच संजय राऊत भांडुप पोलीस स्टेशनला जाणार आहेत. त्यावेळी ते प्रसार माध्यमांशी संवाद साधणार आहेत. भांडूप पोलिस स्टेशनबाहेर ठाकरे गटाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जमले आहेत. कार्यकर्त्यांनी पोलिस स्टेशनबाहेर जोरदार घोषणाबाजी सुरु आहे. खासदार संजय राऊत आणि आमदार सुनिल राऊत पोलिस स्टेशनमध्ये पोहचले आहेत. दत्ता दळवींना अटक का केली ? असा जाब पोलिसांना राऊत विचारणार आहेत. त्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी चर्चा करतील.

शिवसेना उबाठा गटातर्फे रविवारी भांडुपमध्ये ईशान्य मुंबईत राहणाऱ्या कोकणवासियांचा जाहीर मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावापुढे राजस्थान प्रचारावेळी लावण्यात आलेल्या 'हिंदुहृदयसम्राट' या उपमेवरून माजी महापौर दत्ता दळवी यांनी शिवीगाळ केली.

## दत्ता दळवींना अटक ?

भांडूप मध्ये रविवार (दिनांक २६ नोव्हेंबर) शिवसेना ठाकरे गटाचा कोकणवासीय पदाधिकारी कार्यकर्त्यांचा मेळावा होता. या मेळाव्यात शिवसेना ठाकरे गटाचे माजी महापौर, उपनेते दत्ता दळवी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात आपत्तीजनक वक्तव्य केले होते. त्यामुळे आज सकाळी आठ वाजता भांडुप पोलिसांनी त्यांना विक्रोळी येथील राहत्या घरातून अटक केली आहे. आज त्यांना कोर्टात हजर करण्यात येणार आहे.



# अवकाळी पावसामुळे पिकांचे अतोनात नुकसान

## कापुस तुर हरभरा ज्वारी भुई सपाट

वडवणी : वार्ताहर

वडवणी तालुक्यात दुष्काळाच्या झळा तीव्र जाणवत असतांना रविवार दि २६ रोजी रात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने खरीप रब्बी पिकांतील कापुस तुर कांदा हरभरा ज्वारी अदी पिकांच मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शासनाने व पिक विमा कंपनीनेनुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.



सविस्तर वृत्त असे की यावर्षी सुरुवाती पासुन अत्यल्प प्रमाणात पाऊस आसल्याने पसा पसा पाणी घालून शेतकर्यांनी आणलेले पीक.रविवारी झालेल्या अचानक वादळी वाऱ्यासह रब्बी हंगामातील हाता तोंडाशी आलेला घास पूर्णतः हिरा ऊन नेहला असून यामध्ये वेचनीस आलेल्या कापसाच्या वाती झाल्या आहेत.तर तूर कांदा ज्वारी अधि पिकं भुईसपाट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.ज्या शेतकऱ्यांकडे ऊस आहे त्या शेतकऱ्यांच्या ऊसाला थोड्याफार प्रमाणात दिलासा मिळाला आहे.अचानक आलेल्या अवकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पिक विमा कंपनीने व शासनाने पंचनामे करून दुष्काळात होरपळत असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देऊन आधार देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

## संविधानामुळेच लोकशाही, आणि समानता कायम अबाधित –ॲड. विकास जोगदंड

**बीड @ प्रतिनिधी**

आपला भारत देश विशाल, वैविध्यपूर्ण संस्कृती, विचार आणि श्रद्धेने व्यापलेला आहे. देशाची अखंडता टिकवून ठेवून सर्व। मानवी समूहांना सामाजिक, स्वतंत्र, समता, बंधुता, न्याय देऊन देशाचे सार्वभौमत्व जतन करण्यासाठी संविधानाची निर्मिती करण्यात आली म्हणून तर लोकशाही बळकट झाली. समाज परिवर्तनसाठी संविधान निमति, भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी विश्वश्रेष्ठ संविधान देऊन क्रांति केली असून + संविधानामुळेच न्याय पूर्ण लोकशाही, आणि समानता कायम अबाधित आहे आणि कायम राहील



असे प्रतिपादन भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक / अध्यक्ष तथा नगरसेवक अँड विकास जोगदंड यांनी आदर्श मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. बहिरवाडी येथील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या संविधान गौरव दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना केले. यावेळी प्रथमतः संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करत संविधानाच्या मूळ प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले. पुढे बोलतांना जोगदंड यांनी सांगितले की आपण आता संविधानिक अंमलबजावणीच्या ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहोत भारतीय संविधानाचे अमृत

महोत्सवी वर्ष सुरु होत आहे. हा प्रत्येक भारतीयाच्या दृष्टीने हा अभिमानास्पद क्षण आहे. याप्रसंगी आपण सर्व भारतीय मिळून संविधानाचे रक्षण करू हा संकल्प प्रत्येक भारतीय माता, भगिनीं, बांधवांनी करत संविधान बदलण्याची भाषा करणाऱ्याचा लोकशाही मार्गाने कडेलाट देखील करण्याचा निर्धार केला पाहिजे असे ही शेवटी जोगदंड यांनी सांगितले.




पुणे प्रतिनिधी - क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त फुलेवाडा येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऍड.बाळासाहेब आंबेडकर व प्रा.अंजलीताई आंबेडकर यांनी केले अभिवादन..यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## १२ डिसेंबर रोजी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या विराट सभेसाठी पुर्वतयारी साठी आज बैठकीचे आयोजन

**केज @ प्रतिनिधी**

दि.१२ डिसेंबर २०२३ रोजी बोरीसावरगाव - बनसारोळा रोडवर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची विराट सभा होणार असुन सदरील सभेच्या नियोजनासाठी पूर्वतयारी नियोजन बैठक मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नियोजित १२ डिसेंबर रोजी बोरीसावरगाव-बनसारोळा रोड येथील मराठा आरक्षणाच्या महा सभेच्या पूर्वतयारी व नियोजनासाठी बुधवार दि.२९ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी २-०० वाजता मुक्ताई मंगल कार्यालय, जय भवानी चौक,केज येथे बैठक आयोजित केली आहे.तरी सर्व मराठा समाज बांधवांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक सकल मराठा समाज केज तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.




## विलास पवार यांना राज्यस्तरीय क्रांतिसूर्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी । गेवराई

**क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमीत्त परिवर्तन सामाजिक संस्था व जगदीशब्द फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा मानाचा राज्यस्तरीय क्रांतिसूर्य आदर्श शिक्षक पुरस्कार विलास पवार यांना जाहीर झाला आहे. या निवडीनंतर विलास पवार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.**

३ डिसेंबर रोजी पुणे येथे जेष्ठ कामगार नेते व विचारवंत डॉ बाबा आढाव, सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने व अन्य दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे ऐतिहासिक फुलेवाडा येथील सावित्रीबाई फुले सभागृहात संपन्न होणार आहे. गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मुलांची गेवराई येथे शाळेत कार्यरत असणारे शिक्षक विलास पवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. विलास पवार यांनी आज पर्यंत तन-मन-धन अर्पण करून केलेल्या कार्याला आणि सद्यस्थितीत सर्वोत्कृष्ट उपक्रम राबवून करत असलेल्या विद्यार्थ्यांचा



शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकास आणि उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेऊन जगदीशब्द फाउंडेशन व परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या वतीने हा पुरस्कार विलास पवार यांना जाहीर झाला आहे. ३ डिसेंबर रोजी सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्यात व क्रांतीसुर्य महात्मा फुले व सावित्रीबाई च्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक फुलेवाड्या शेजारी असणारे भव्यदिव्य ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार आहे. महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण, कला, पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत मानाचा, कर्तुत्वाचा, विचारांचा, चर्चेचा आणि सन्मानाचा पुरस्कार वितरण सोहळा रविवार ३ डिसेंबर २०२३ रोजी पुणे येथे होणार आहे.



## मिल्लीया महाविद्यालयात संविधान दिन साजरा

प्रतिनिधी । बीड

बीड: येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. माधव मुंडे (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा) अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील तसेच उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ,

उपप्राचार्य डॉ. हुसैनी एसएस, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग, डॉ. शेख रफिक, प्राध्यापिका डॉ. शेख एजाज परवीन यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर मिर्झा असद बेग यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. माधव मुंडे यांनी भारतीय संविधान हे सर्वश्रेष्ठ असून, त्यातून भारतीय जीवनशैली, स्वतंत्र, समता, बंधुता व सर्वधर्म समभावाची शिकवण मिळते तसेच संविधानाने आपल्याला अनेक हक्क दिले आहेत, त्यामुळे आपण संपूर्ण स्वातंत्र्य आणि समानतेने जीवन जगतो असे सांगितले. तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ यांनी उद्देश पत्रिकेचे वाचन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी संविधानातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान, भारतीय संविधानातील मूल्य, त्यांचे अर्थ, प्रत्येक भारतीयाची मूलभूत कर्तव्य यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. शेख रफिक यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT